**रे.दि.मु.नं.३२६/२०१९**

## निशाणी ३३ खालील आदेश
## (भाऊसाहेब जगताप वगैरे वि. सुभाष खेडेकर वगैरे)

प्रस्तुतचा अर्ज वादींनी वादी क्र. १ यांचेविरुध्दचा 'दावा रद्द करण्याचा' हुकूम रद्द होवून मिळणेसाठी केलेला आहे. वादींच्या कथनानुसार, वादी हे अडाणी असल्याने तसेच त्यांना कायद्याचे पुरेसे ज्ञान नसल्याने वादी क्र.१ हे मयत असल्याची बाब, त्यांचे वारसांची माहिती व मृत्युचा दाखला वकिलांना वेळेवर देऊ शकले नाहीत. त्यामुळे वारस रेकॉर्डवर घेणेस त्यांना ५ महिने ९ दिवसांचा विलंब झालेला आहे. त्यामुळे वादी क्र.१ चे विरुद्ध दावा रद्द झालेला आहे. तरी वादी क्र.१ यांच्याविरुद्ध झालेला दावा रद्दचा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी वादीने सदरच्या अर्जाद्वारे विनंती केली आहे.

२. सदर अर्जास प्रतिवादी क्र.५ तर्फे म्हणणे देऊन सदरचा अर्ज खोटा, लबाडीचा असून प्रतिवादी यांना मान्य नाही. वादी क्र.१ हे दि.१०/०३/२०२२ रोजी मयत झालेले असून वादी यांना झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण दिलेले नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात यावा. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करायचे न्यायालयाचे मत झालेस जास्तीत जास्त खर्चावर मंजुर करावा.

३. सदरच्या अर्जावर दोन्ही वकिलांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा हा ठराव व निरंतर मनाईसाठी दाखल केलेला आहे. दाव्यातील मागणी पाहता वादाचा विषय गुणदोषांवर निर्गत होणे आवश्यक आहे. त्यासाठी वादी क्र.१ बाबत दावा रद्दचा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. त्यासाठी दोन्ही पक्षकारांना योग्य ती संधी देणे आवश्यक आहे. सदर अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. याउलट, दावा गुणदोषांवर निर्गत होणेस मदतच

होईल. परंतु, वादीने केलेला विलंब लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यासाठी विलंबाचा खर्च त्याच्यावर ठेवणे योग्य आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज (नि.३३) वादी यांनी रक्कम रु. ४००/- (रूपये चारशे फक्त) एवढे पुढील तारखेपर्यंत प्रतिवादींना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादी क्र.१ यांचे विरुद्ध दावा रद्दचा आदेश रद्द करण्यात येतो.

**सही/-**

**( सौ. एस. के. देशमुख )**

सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,

सासवड.

सासवड.

दिनांक २७/०६/२०२३.

**<u>CERTIFICATE</u>**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Mrs. S. R. Kamble, |
| (b) | Court | : | Mrs. S. K. Deshmukh,<br>Civil Judge, J.D. &<br>J.M.F.C.,Saswad |
| (c) | Date of Judgment /Order | : | 27/06/2023 |
| (d) | Judgment /Order signed by P.O. on | : | 27/06/2023 |
| (e) | Judgment /Order uploaded on | : | 12/07/2023 |